क्रमांक : एमआयएस-०६१६/सीआर-७५/२०१६/तीन                                                            दिनांक : १६ नोव्हेंबर, २०१६.

# घोषणा

## ( काही स्पर्धा परीक्षा पध्दतीमधील बदलांबाबत )

**(अ)** सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक पदांसाठी — सामाईक पूर्व परीक्षा

**(ब)** लिपिक-टंकलेखक, कर सहायक व पोलिस उप निरीक्षक मर्यादीत विभागीय परीक्षा दोन टप्प्यांमध्ये घेणे.

**(क)** महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा (स्थापत्य, विदयुत, यांत्रिकी तसेच विदयुत व यांत्रिकी)- सामाईक पूर्व परिक्षा

**(अ) सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक** या पदांवरील भरतीकरीता सध्या आयोगाकडून स्वतंत्र जाहिरात, स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र पूर्व परीक्षा घेतल्या जातात. या तीनही पूर्व परीक्षांसाठी परीक्षा योजना, अभ्यासक्रम, प्रश्नसंख्या, गुण, वेळ एकसमान आहेत. तरीही स्वतंत्र पूर्व परीक्षांमुळे प्रत्येक परीक्षेसाठी अर्ज करणे, परीक्षा शुल्क भरणे, पूर्व तयारी/अभ्यास, प्रवास, निवास व्यवस्था, रजा घेणे (लागू असल्यास) अशा बाबींवर उमेदवारांना स्वतंत्रपणे व पुन्हा पुन्हा वेळ व पैसा खर्च करावा लागतो. निवड प्रक्रियेतही विलंब होतो. या बाबी टाळण्यासाठी सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक पदांवरील भरतीकरीता **एकच संयुक्त पूर्व परीक्षा** घेण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे. आता या तीनही पदांकरीता संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते या पैकी एक, दोन किंवा तीनही पदांसाठी बसू इच्छितात काय, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल. संबंधित पदांकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पदभरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील व त्याच्या आधारे तसेच, भरावयाच्या पदसंख्येच्या आधारे, संबंधित पदाच्या मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेच्या आधारे तीनही पदांकरीता स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येतील. त्यानंतर त्या त्या पदाच्या मुख्य परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांची विदयमान मुख्य परीक्षा योजना व अभ्यासक्रमाच्या आधारे, स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल. पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षांचा अभ्यासक्रम, प्रश्नसंख्या, गुण, वेळ अशा इतर बाबींमध्ये कोणताही बदल नाही.

**(ब) लिपिक-टंकलेखक, कर सहायक,** विक्रीकर विभाग तसेच **पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा** या सध्या एकाच टप्प्यात, लेखी परीक्षेद्वारे घेण्यात येतात. सदर परीक्षेकरीता प्राप्त होणा-या अर्जांची मोठी संख्या लक्षात घेऊन सदर तीनही पदांकरीता यापुढे **पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा** अशा दोन टप्प्यामध्ये निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. तीनही पदांसाठी स्वतंत्र पूर्व परीक्षा व स्वतंत्र मुख्य परीक्षा राहील. त्यासाठी परीक्षा योजना व अभ्यासक्रम इत्यादी बाबीं स्वतंत्रपणे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**(क)** सध्या महाराष्ट्र **स्थापत्य** अभियांत्रिकी सेवा, महाराष्ट्र **यांत्रिकी** अभियांत्रिकी सेवा, महाराष्ट्र **विदयुत** अभियांत्रिकी सेवा तसेच महाराष्ट्र **विदयुत व यांत्रिकी** अभियांत्रिकी सेवा या अभियांत्रिकी शाखेतील पद भरतीकरीता स्वतंत्र जाहिराती प्रसिध्द करुन स्वतंत्र परीक्षा घेण्यात येतात. सदर प्रक्रियेमध्ये उदभवणा-या अडचणी, भरती प्रक्रियेस लागणारा विलंब इत्यादी बाबी लक्षात घेऊन यापुढे **स्थापत्य, विदयुत, यांत्रिकी** तसेच **विदयुत व यांत्रिकी** या चारही शाखांकरीता एकच **महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा** घेण्यात येईल. पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित शाखेतील पात्र उमेदवारांसाठी, प्रत्येक शाखा/पदासाठी स्वतंत्र मुख्य परीक्षा घेण्यात येईल. यासंदर्भातील परीक्षा योजना व अभ्यासक्रम इत्यादी बाबीं स्वतंत्रपणे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

वरील बदल **सन २०१७** मध्ये प्रसिध्द होणा-या जाहिरातींपासून लागू होतील.

ठिकाण : मुंबई

प्रदीप कुमार
सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.